प्रकरण IV

डीएमएफटी निधीचे व्यवस्थापन

प्रकरण IV

डीएमएफटी निधीचे व्यवस्थापन

महाराष्ट्र डीएमएफटी नियम, 2016 च्या नियम 11 नुसार, प्रत्येक डीएमएफटीची नियामक परिषद ट्रस्ट अंतर्गत एक निधी स्थापन करेल ज्याला डीएमएफटी निधी म्हणून ओळखले जाईल आणि हा निधी ट्रस्टच्या व्यवस्थाकीय समितिद्वारे व्यवस्थापित केला जाईल. ट्रस्टला नियम 11(2)[8] मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्त्रोतांमधून रक्कम मिळेल.

भारत सरकार आणि महाराष्ट्र डीएमएफटी नियम, 2016 द्वारे जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, डीएमएफटी निधीमध्ये करावयाच्या योगदानाची रक्कम ही प्रमुख आणि गौण खनिजांवर प्रदान केलेल्या रॉयल्टीची टक्केवारी म्हणून काढण्यात येते. खनिज (लिलाव) नियम, 2015 नुसार संबंधित डीएमओला डीएमएफटी अंतर्गत योगदानासह रॉयल्टी आणि इतर खनिकर्म देय वेळेवर[9] प्रदान न केल्यास, गौण खनिजावर वार्षिक 15 टक्के आणि प्रमुख खनिजावर वार्षिक 12 टक्के व्याज आकारले जाते.

4.1 डीएमएफटी निधीचे संचयन व वितरण

2016-17 ते 2022-23 या कालावधीसाठी निवडक पाच डीएमएफटींच्या संदर्भात संग्रह केलेला आणि वितरित केलेला निधी **आलेख 3** मध्ये दर्शविला आहे:

---

[8] (1) राज्य शासनाने केलेली सुरुवातीची तडजोड (2) राज्य शासनाकडून मिळालेले कोणतेही अनुदान, योगदान किंवा इतर भांडवली सहाय्य (3) महाराष्ट्र डीएमएफटी नियम 2016 च्या नियम 2 च्या उपनियम (1) च्या खंड (g) मध्ये परिभाषित केलेले योगदान (4) गुंतवणूक आणि इतर ठेवी आणि त्यावर जमा झालेले व्याज आणि त्यापासून मिळणारे इतर कोणतेही उत्पन्न (5) ट्रस्टच्या इतर सर्व मालमत्ता आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न किंवा त्याचे अधिमूल्यन आणि (6) एसएलएमसीने ठरवल्यानुसार इतर जिल्ह्यांच्या योगदान निधीतून मिळालेला निधी.

[9] महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास आणि नियमन) नियम, 2013 नुसार, प्रत्येक त्रैमासिक पूर्ण झाल्यानंतर 15 दिवसांच्या आत संपणाऱ्या प्रत्येक त्रैमासिकसाठी भाडेपट्टाधारकाद्वारा ट्रस्ट निधी प्रदान केला जाईल.

आलेख 3: 2016-17 ते 2022-23 दरम्यान निधीचे संचयन



(स्त्रोत: डीएमएफटींच्या अभिलेख्यांनुसार)

2016-17 ते 2022-23 या कालावधीत दिलेल्या कामांचा, पूर्ण झालेल्या कामांचा, डीएमएफटी निधी संचयनाच्या तुलनेत अंमलबजावणी यंत्रणेला वितरित केलेल्या रक्कमेचा तपशील **तक्ता 5** मध्ये दिला आहे:

तक्ता 5: कामांसाठी डीएमएफटी निधी संचयनाच्या तुलनेत अंमलबजावणी यंत्रणाचा वितरण तपशील

(₹ कोटींमध्ये)

डीएमएफटी	एकूण डीएमएफटी निधी संचयन	प्रशासकीय मंजूरीची रक्कम (एकूण कामासाठी)	अंमलबजावणी यंत्रणेला वितरित केलेली रक्कम	हाती घेतलेल्या एकूण कामांची संख्या (संख्या)	पूर्ण झालेल्या कामांची एकूण संख्या (संख्या)
नागपूर	1,032.85	824.37	574.14	5,036	2,126
चंद्रपूर	1,428.77	917.14	712.25	4,286	3,558
यवतमाळ	743.04	429.83	289.60	2,910	1,333
भंडारा	63.18	33.45	21.45	216	211
रायगड	86.75	28.99	18.82	106	86
एकूण	**3,354.59**	**2,233.78**	**1,616.26**	**12,554**	**7,314**

(स्त्रोत: डीएमएफटींच्या अभिलेख्यांनुसार)

वरील तक्ता दर्शविते की:

- निवडक पाच डीएमएफटींनी एकूण डीएमएफटी निधी संचयनाच्या केवळ 66.59 टक्के प्रशासकीय मान्यता प्रदान केले.

- मंजूर कामांसाठी संचयन केलेल्या एकूण निधीपैकी केवळ 48.18 टक्के निधी वितरित केला होता.

तक्ता 5 वरून असे सूचित होते की:

- निवडक पाच डीएमएफटींमध्ये हाती घेतलेल्या प्रकल्पांपैकी 58.26 टक्के प्रकल्प पूर्ण झाले.
- अपूर्ण कामांची सर्वाधिक संख्या डीएमएफटी नागपूरमध्ये 2,910 कामे (57.78 टक्के) आणि डीएमएफटी यवतमाळमध्ये 1,577 कामे (54.19 टक्के) होती.

काम पूर्ण होण्याची संथ गती आणि निधीचा कमी वापर हे दर्शविते की डीएमएफटींनी अंमलबजावणी यंत्रणेला वितरित केलेल्या निधीच्या वापरावर देखरेखीचा अभाव होता.

महाराष्ट्र शासनाने म्हटले (फेब्रुवारी 2025) की, अंमलबजावणी यंत्रणेच्या विनंतीनुसार नियामक परिषदेने कामे मंजूर केली होती. तथापि, कोविड महामारीमुळे कामे सुरू/अमलात आणता आली नाहीत आणि निधीचा योग्य गतीने वापर करता आला नाही.

हे उत्तर समर्थनीय नाही कारण कोविड कालावधीपूर्वी आणि नंतरही कामांची प्रगती आणि डीएमएफटी निधीचा वापर मंद होता.

4.2 डीएमएफटी योगदानाचे संचयन

सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, महानगरपालिका, शिक्षण विभाग इत्यादी संस्था डीएमएफटींनी दिलेले काम स्वतःहून किंवा कंत्राटदारांमार्फत करतात. काम करणाऱ्या संस्थांना निष्पादित झालेल्या कामावर वापरलेल्या खनिजासाठी रॉयल्टी प्रदानाचा आणि डीएमएफटी निधी योगदानाचा पुरावा डीएमओंना सादर करावा लागतो. डीएमओंनी वसूल केलेले डीएमएफटी निधी योगदान डीएमएफटी निधी खात्यात जमा करावे लागते.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की डीएमओ चंद्रपूर, यवतमाळ आणि रायगड यांना या संस्थांकडून ₹ 207.24 कोटी (₹ 155.36 कोटी + ₹ 51.10 कोटी + ₹ 0.78 कोटी) ची रॉयल्टी प्राप्त झाली. तथापि, या संस्थांद्वारा (जसे की सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, महानगरपालिका, शिक्षण विभाग इत्यादी) 10 टक्के डीएमएफटी निधी योगदान ₹ 20.72 कोटी वसूल केले नव्हते आणि संबंधित डीएमएफटींना पाठवले गेले नाही.

महाराष्ट्र शासनाने लेखापरीक्षण निरीक्षणाचा स्वीकार करताना (डिसेंबर 2024) म्हटले की वसुलीसाठी नोटिसा जारी करण्यात आल्या आहेत आणि सदर

प्रकल्पांमध्ये सर्व डीएमओना डीएमएफटी निधी योगदान जमा करण्यासाठी योग्य निर्देश दिले जातील.

4.3 महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितकडून डीएमएफटी निधी योगदानाची वसुली

महाराष्ट्र शासनाने अधिसूचनेद्वारे (27 मे 2019), नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवेच्या निष्पादनासाठी गौण खनिज उत्खननावर 100 टक्के रॉयल्टी सूट दिली. तथापि, 21 जून 2021 रोजी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, डीएमएफटी निधीमध्ये योगदानाच्या प्रदानातून सूट देण्यात आली नव्हती.

कार्यकारी यंत्रणा म्हणजे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (एमएसआरडीसी) ने प्रकल्पासाठी उचललेल्या खनिजांवर ₹ 242.16 कोटी (म्हणजेच ₹ 2,421.56 कोटींच्या सूट दिलेल्या रॉयल्टीच्या 10 टक्के) डीएमएफटी निधी जून 2021 पर्यंत दिला नाही.

महाराष्ट्र शासनाने, वरील स्पष्टीकरणाच्या आधारे, एमएसआरडीसीकडून रॉयल्टीच्या 10 टक्के दराने ₹ 242.16 कोटी रकमेच्या डीएमएफटी निधीची मागणी केली. ही रक्कम अद्याप एमएसआरडीसीकडून वसूल झालेली नाही.

महाराष्ट्र शासनाने लेखापरीक्षण निरीक्षण स्वीकारताना (फेब्रुवारी 2025) म्हटले की, खनिकर्म विभाग हा मुद्दा उपस्थित करेल आणि डीएमएफटी निधीची भरपाई करण्यासाठी महसूल विभाग तसेच एमएसआरडीसीकडे प्रस्ताव पाठवेल.

4.4 लेखापुस्तके, दस्तऐवज आणि अभिलेख्यांचा रखरखाव

महाराष्ट्र डीएमएफटी नियम, 2016 च्या नियम 9(2) आणि नियम 15 मध्ये असे नमूद केले आहे की व्यवस्थाकीय समिति संबंधित भाडेपट्टेधारकांकडून डीएमएफटी निधी वेळेवर जमा करण्याची खात्री करेल आणि डीएमएफटीच्या कारभाराचे खरे आणि निष्पक्ष चित्र दर्शविण्यासाठी डीएमएफटी निधीच्या संदर्भात योग्य लेखापुस्तिका, दस्तऐवज आणि अभिलेखे ठेवेल.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की निवडक पाच डीएमएफटींच्या कोणत्याही नियामक परिषदेनी डीएमएफटी निधीची मागणी आणि संचयन नोंदवही ठेवली नव्हती. नियंत्रण आणि तपासणी यंत्रणेच्या अभावी, डीएमएफटीची मागणी, संचयन आणि वित्तप्रेषण यांची योग्य प्रकारे नोंद ठेवता आणि मेळ घालता आले नाही.

महाराष्ट्र शासनाने म्हटले (डिसेंबर 2024), की, भाडेपट्टेधारकांकडून जीआरएएस (शासकीय वेबसाइट) द्वारे प्रदान केले जाते आणि त्यानुसार डीएमएफटी निधी

जमा केला जातो आणि निधी संचयनात कोणतीही कमतरता नव्हती. पुढे, डीएमएफच्या मागणी आणि संचयनावर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी, डीएमएफटी निधी ठेव पावती दाखल केल्यानंतरच भाडेपट्टेधारकांना पारगमन पास जारी केले जात असल्याचे सादर करण्यात आले.

उत्तर मान्य नाही कारण महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार, दोन्ही प्रमुख आणि गौण खनिजांच्या संदर्भात संचयन केलेल्या रॉयल्टीच्या तुलनेत संचयन केलेल्या निधीमध्ये विसंगती दिसते. या शिवाय, मागणी आणि संचयन नोंदवही नसल्यामुळे प्राप्त होण्याजोगा आणि प्राप्त होणारा निधी जुळत नव्हता.

4.5 डीएमएफटी नागपूरमधील प्रमाणित लेख्यानुसार डीएमएफटी निधीच्या प्राप्तीतील फरक

12 जानेवारी 2015 रोजी किंवा त्यानंतर दिलेल्या खनिकर्म भाडेपट्ट्याच्या बाबतीत खाण आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम, 1957 (1957 चा 67) मध्ये विहित केलेल्या रॉयल्टीच्या 10 टक्के दराने आणि 12 जानेवारी 2015 पूर्वी दिलेल्या मोठ्या खनिकर्म भाडेपट्ट्याच्या रॉयल्टीच्या 30 टक्के दराने प्रत्येक खनिकर्म भाडेपट्टेधारकाला डीएमएफटी निधीत योगदान प्रदान करावयाचे होते.

पाच निवडक डीएमएफटींमध्ये डीएमएफटी योगदानाच्या प्राप्तीशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी करताना, असे लक्षात आले की डीएमएफटींद्वारे दिलेले आकडे आणि प्रमाणित लेख्यांचे आकडे चार डीएमएफटींमध्ये जुळत असले तरी, डीएमएफटी नागपूरमध्ये डीएमएफटी नुसार आणि प्रमाणित लेख्यानुसार 2016-17 ते 2021-22 या कालावधीत **तक्ता 6** मधील तपशीलानुसार, प्राप्तीच्या आकड्यांमध्ये तफावत होती.

तक्ता 6: डीएमएफटी योगदान आणि प्रमाणित लेख्यांच्या आकडेवारीतील फरक

(₹ कोटींमध्ये)

वर्ष	कोळसा	इतर	गौण	एकूण	प्रमाणित लेख्यानुसार	फरक
	डीएमएफटींच्या अभिलेख्यांनुसार					
2016-17	33.39	3.69	6.58	43.66	43.67	(0.01)
2017-18	86.30	2.65	13.47	102.42	101.83	0.59
2018-19	118.91	0.99	24.14	144.04	138.17	5.87
2019-20	137.66	5.11	32.78	175.55	152.20	23.35
2020-21	118.03	3.21	24.60	145.84	136.27	9.57
2021-22	154.51	3.87	27.22	185.60	174.60	11.00
एकूण	**648.80**	**19.52**	**128.79**	**797.11**	**746.74**	**50.37**

(स्त्रोत: डीएमएफटी नागपूरच्या अभिलेख्यांनुसार)

2016-17 ते 2021-22 या कालावधीत, डीएमएफटी अभिलेख्यानुसार मिळालेल्या डीएमएफटी निधी योगदानात आणि डीएमएफटी नागपूरच्या प्रमाणित लेख्यांमध्ये

असलेल्या डीएमएफटी निधीमध्ये ₹ 50.37 कोटींचा फरक असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. अशाप्रकारे, डीएमएफटी नागपूरने डीएमएफटी निधीचा मेळ न घालता लेखे प्रमाणित केले.

महाराष्ट्र शासनाने उत्तर दिले (फेब्रुवारी 2025) की व्याज उत्पन्न आणि अंमलबजावणी यंत्रणेने परत केलेली रक्कम (मनाई केलेल्या किंवा रद्द केलेल्या अग्रिम धनादेशांमुळे) प्रमाणित लेख्यांमध्ये डीएमएफटी निधी म्हणून गणला जात नव्हता.

लेखापरीक्षणाचे असे मत आहे की लेखे खरे आणि निष्पक्ष दृष्टिकोन देत नाहीत कारण डीएमएफटी निधीवर जमा झालेले व्याज आणि अंमलबजावणी यंत्रणेने डीएमएफटी नागपूरला परत केलेली रक्कम प्रमाणित लेख्यांचा भाग असावी. हे प्रमाणित लेख्यांचा डीएमएफटी नागपूरने लेखापरीक्षणाला दिलेल्या डीएमएफटी लेख्याच्या आकडेवारीशी मेळ घालत नसल्याचे दर्शवते.

4.6 एकात्मिकृत भाडेपट्टा व्यवस्थापन प्रणाली

खनिज विभागाच्या रॉयल्टी संचयनाची मानवी हस्तक्षेपाने करण्यात येणाऱ्या प्रशासकीय प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यासाठी एकात्मिकृत भाडेपट्टा व्यवस्थापन प्रणाली (आयएलएमएस) विकसित करण्यात आली होती, ज्याचा उद्देश डेटाचा एकच स्रोत आणि अचूक-कार्यक्षम-रिअल-टाइम एमआयएस डेटा निर्माण करणे हा होता. यामुळे रॉयल्टी संचयन आणि इतर सांविधानिक प्राप्तीच्या महसूल निर्मितीमध्ये पारदर्शकता निर्माण होईल.

आयएलएमएसकडून पूर्ण कार्यक्षमता मिळविण्यासाठी आणि रिअल-टाइम एमआयएस अहवाल तयार करण्यासाठी, प्रत्येक मॉड्यूलमध्ये भाडेपट्टेदार, लक्ष्ये उत्पादन, उत्खनन इत्यादींबाबत रिअल-टाइम डेटा अपडेट करणे आवश्यक होते जेणेकरून सांविधानिक प्राप्ती, प्रत्यक्ष प्राप्ती, महसुलाची प्रलंबित प्राप्ती यांचे मूल्यनिर्धारण करता येईल.

लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले की वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) हा महाराष्ट्र शासनाला सर्वात मोठ्या रॉयल्टी योगदानक करणाऱ्यापैकी एक आहे, परंतु आयएलएमएस मध्ये कोळसा उत्खनन डेटा अपलोड केला गेला नाही. डब्ल्यूसीएल ने सादर केलेल्या डेटानुसार डीएमएफटी निधी हस्तांतरित केला गेला ज्यामुळे एकल स्रोत डेटा तयार करण्याचे उद्दिष्ट नाकारले गेले. विविध प्रसंगी(26 नोव्हेंबर 2014 ते 01 फेब्रुवारी 2021) डीजीएमने सर्व डीएमओंना आणि प्रादेशिक कार्यालयांना आयएलएमएस मध्ये महसूल संचयनाशी संबंधित सर्व व्यवहार समाविष्ट करण्यासाठी रिअल-टाइम डेटा अपलोड करण्याचे

निर्देश दिले होते जे पाळले जात नव्हते. म्हणूनच, निवडक पाच जिल्ह्यांमध्ये प्रमुख खनिजांवरील रॉयल्टीची टक्केवारी म्हणून डीएमएफटी निधीचे संचयन लेखापरीक्षणाद्वारे सत्यापित केले जाऊ शकले नाही.

महाराष्ट्र शासनाने तथ्ये स्वीकारताना (डिसेंबर 2024) नमूद केले की आयएलएमएस अद्ययावत करण्यासाठी एक प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे जे आयएलएमएस मॉड्यूल्सची प्रगत आवृत्ती सादर करण्याची खात्री करेल जेणेकरून सर्व खनिकर्मामध्ये दैनंदिन कामकाजात प्रणाली प्रभावीपणे वापरली जाऊ शकेल. तसेच, आयएलएमएसमध्ये डब्ल्यूसीएलच्या कॉन्फिगरेशनसाठी डब्ल्यूसीएलकडे प्रकरण उपस्थित केले जात आहे.

4.7 अपुऱ्या निधी व्यवस्थापनामुळे व्याजाचे नुकसान

27 ऑक्टोबर 2015 च्या आदेशानुसार, महाराष्ट्र शासनाने असे नमूद केले होते की वापरात नसलेला अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकांच्या मुदत ठेवींमध्ये गुंतवता येईल. पुढे, उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासना चे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी व्यवस्थाकीय समिति आणि डीएमएफटी च्या नियामक परिषदेच्या मंजुरीनंतर डीएमएफकडे असलेला अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकांमधील अल्पकालीन ठेवींमध्ये गुंतवण्याचे निर्देश दिले (26 ऑक्टोबर 2017). नागपूरच्या डीजीएमने देखील डीएमएफकडे असलेला अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मुदत ठेवींच्या स्वरूपात गुंतवण्याचा पुनरुच्चार केला (जून 2020).

निवडक डीएमएफटींच्या प्राप्ती आणि खर्चाच्या समीक्षादरम्यान लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की **परिशिष्ट 4** मधील तपशीलानुसार बचत बँक खात्यात अवाढव्य निधी पडून होता. डीएमएफटींनी, विवेकपूर्ण आर्थिक व्यवस्थापनासाठी, डीएमएफटी चालवण्याच्या दैनंदिन खर्चाच्या वार्षिक आधारे बांधील दायित्वे व प्रकल्पांसाठी आवश्यक असलेला निधी विचारात घेऊन, वर नमूद केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या आदेशांनुसार अतिरिक्त निधी मुदत ठेवींमध्ये गुंतवू शकले असते.

डीएमएफटी यवतमाळ व डीएमएफटी रायगड वगळता, निवडक डीएमएफटींद्वारा 2016-17 ते 2022-23 या वर्षात संचयन केलेले डीएमएफटी निधी योगदान राष्ट्रीयीकृत बँकांच्या बचत खात्यात जमा केले होते आणि त्यावर वार्षिक सरासरी

तीन टक्के[10] दराने व्याज कमावले होते. मुदत ठेवींमध्ये निधी जमा न करणे हे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन आहे.

महाराष्ट्र शासनाने (डिसेंबर 2024) लेखापरीक्षण निरीक्षण मान्य केले आणि म्हटले की अतिरिक्त निधी मुदत ठेवी आणि स्वाइप खात्यांमध्ये ठेवला जाईल.

4.8 डीएमएफटीला खनिज विकास निधीचे हस्तांतरण

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती आणि वापर) निधी अधिनियम, 2001 अधिनियमित केला आणि त्याअंतर्गत खनिज विकास निधी (एमडीएफ)[11] मध्ये जमा झालेल्या निधीचा वापर खनिज शोध आणि राज्यातील खनिकर्माशी संबंधित कामांमुळे बाधित झालेल्या क्षेत्रांच्या विकासाकरिता विशेष तरतुदी करण्यासाठी नियम तयार केले आणि राज्य खनिज धोरण 1999 अंतर्गत महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित (एमएसएमसीएल) ला "शेल यंत्रणा" म्हणून नियुक्त केले.

महाराष्ट्र डीएमएफटी नियम 2016 तयार झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने 2001 चा अधिनियम रद्द केला (जानेवारी 2017) आणि त्यानंतर विकास योजना, उपक्रम संबंधित डीएमएफटींनी राबवायचे होते.

एमडीएफ अंतर्गत महाराष्ट्र शासनाला 1999-2000 ते 2014-2015 या वर्षात संचयन केलेल्या एकूण खनिज महसुलाच्या 10 टक्के रक्कम म्हणून ₹ 1,727.03 कोटी प्राप्त झाले होते, जे खनिज उत्खनन आणि खनिकर्माशी संबंधित कामांमुळे बाधित झालेल्या क्षेत्रांच्या विकासासाठी एमएसएमसीएलकडे हस्तांतरित करावयाचे होते. यापैकी, महाराष्ट्र शासनाने 1999-2000 ते 2018-19 या कालावधीत, एमएसएमसीएलला ₹ 706.67 कोटी वितरित केले. महाराष्ट्र शासनाच्या सप्टेंबर 2016 च्या अधिसूचनेनुसार, उर्वरित रकमेच्या दोन तृतीयांश रक्कम ₹ 1,020.36 कोटी जिल्ह्यांना आणि एक तृतीयांश रक्कम डीजीएम आणि एमएसएमसीएलला वाटप करायची होती. महाराष्ट्र शासनाने (एमडीएफ अंतर्गत) जमा केलेल्या ₹ 1,020.36 कोटींच्या हस्तांतरण आणि वापराचा तपशील लेखापरीक्षणाला दिला नव्हता.

[10] मुदत ठेवी वरील सरासरी व्याजदर म्हणजे सहा टक्के आणि बचत खात्यांचे सरासरी व्याजदर म्हणजे तीन टक्के यातील फरक.

[11] महाराष्ट्र शासनाकडून संचयन होणाऱ्या रॉयल्टीपैकी 10 टक्के रक्कम राखीव ठेवली जाईल आणि ती एमडीएफचा भाग असेल.

डीएमएफटी स्थापन झाल्यानंतर (सप्टेंबर 2016), मंजूर प्रलंबित कामे आणि बांधील दायित्वे (निधी) संबंधित डीएमएफटीकडे हस्तांतरित करणे आवश्यक होते (दिनांक 17 एप्रिल 2018 चे पत्र).

महाराष्ट्र शासनाने एमएसएमसीएलला निर्देश जारी केले (17 एप्रिल 2018), ज्यामध्ये असे म्हटले होते की डीएमएफटी तयार झाल्यावर, मंजूर प्रलंबित कामे आणि बांधील दायित्वे संबंधित डीएमएफटीकडे हस्तांतरित करावयाची होती. या संदर्भात, निवडक पाच पैकी तीन[12] डीएमएफटींमध्ये एमडीएफकडून हस्तांतरित केलेली कामे खालील **तक्ता 7** मध्ये दिली आहेत:

तक्ता 7: एमडीएफ अंतर्गत मंजूर केलेल्या कामांसाठी एमएसएमसीएलकडून परतफेड करावयाचा निधी

डीएमएफटीचे नाव	कामांची एकूण संख्या	अंदाजित किंमत (₹ कोटींमध्ये)	परतफेड करावयाची रक्कम (₹ कोटींमध्ये)
नागपूर	73	29.41	27.74
	29	16.67	16.67
रायगड	32	8.58	3.67
चंद्रपूर	134	75.61	8.77
एकूण	**268**	**130.27**	**56.85**

(स्त्रोत: डीएमएफटींद्वारा दिलेली माहिती)

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार एमएसएमसीएलने एमडीएफ अंतर्गत मंजूर केलेली 268 कामे (ऑगस्ट 2013 ते सप्टेंबर 2016) डीएमएफटीला निधी हस्तांतरित न करता हस्तांतरित केली. डीएमएफटींनी डीएमएफटी निधीतून ₹ 56.85 कोटींची कामे पूर्ण केली, जी अद्याप एमएसएमसीएलकडून वसूल झालेली नाही.

महाराष्ट्र शासनाने म्हटले (डिसेंबर 2024) की एमडीएफ अंतर्गत आधीच मंजूर झालेल्या चालू/पूर्ण विकास कामांसाठी निधी उपलब्ध करता येऊ शकला नाही.

शासनाचे हे उत्तर मान्य नाही, कारण एमएसएमसीएलने एमडीएफ अंतर्गत मंजूर केलेली कामे हस्तांतरित केली, परंतु महाराष्ट्र शासनच्या सूचनांनुसार संबंधित डीएमएफटी निधी हस्तांतरित केला नाही.

4.9 आयकर कपातीचे टाळता येण्याजोग्या प्रदान आणि आयकर विवरणपत्रे दाखल न करणे

वित्त मंत्रालय, भारत सरकारच्या दिनांक 10 सप्टेंबर 2021 च्या अधिसूचनेने, डीएमएफटीला आयकर कायदा, 1961 च्या कलम 10 च्या खंड (46) अंतर्गत त्या प्राधिकरणाला उद्भवणाऱ्या विशिष्ट उत्पन्नाच्या संदर्भात प्राधिकरणाचा वर्ग

[12] यवतमाळ आणि भंडारा येथील एमडीएफ अंतर्गत कामे हस्तांतरित करण्यात आली नाहीत.

म्हणून 2017-18 ते 2022-23 या आर्थिक वर्षापासून पूर्वलक्षी प्रभावाने घोषित केले आहे. पुढे, डीएमएफटीला आयकर कायदा, 1961 च्या कलम 139 च्या उपकलम (4क) च्या खंड (ग) च्या तरतुदीनुसार आयकर विवरण दाखल करावे लागेल आणि आयकर कायदा, 1961 च्या कलम 288(2) च्या स्पष्टीकरणातील तरतुदीनुसार लेखापालाने योग्यरित्या सत्यापित केलेला लेखापरीक्षण अहवाल देखील विवरणासह वरील अटी पूर्ण झाल्याचे सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्रासह दाखल करावा लागेल.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की:

(i) केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) 04 ऑक्टोबर 2023 च्या अधिसूचनेनुसार, सर्व डीएमएफटींला मुदत ठेवींमधील गुंतवणुकीवरील व्याजावर आयकर प्रदान करण्यास सूट देण्यात आली होती. ही सूट 2022-23 वित्तीय वर्षापासून लागू होती.

पाच निवडक डीएमएफटींच्या नोंदींची परिनिरीक्षण केली असता असे दिसून आले की डीएमएफटी यवतमाळच्या बाबतीत, जरी डीएमएफटीला आयकर प्रदान करण्यापासून सूट देण्यात आली होती तरीही बँकेने 2022-23 (₹ 0.32 कोटी) आणि 2023-24 (₹ 1.61 कोटी) दरम्यान विशेष मुदत ठेवींवर ₹ 1.93 कोटी इतकी स्त्रोतावर कर कपात (टीडीएस) वजा केली. डीएमएफटी यवतमाळने आयकर अधिकाऱ्यांकडून त्यासाठी परतावा मागितला नाही कारण त्यांनी आयकर विवरण (आयटीआर) दाखल केले नव्हते.

(ii) निवडक पाच डीएमएफटींपैकी नागपूर, यवतमाळ आणि रायगड यांनीही 2017-18 ते 2022-23 या कर निर्धारण वर्षापासून आयकर विवरणपत्रे दाखल केली नव्हती.

महाराष्ट्र शासनाने स्वीकारताना (डिसेंबर 2024) असे म्हटले की डीएमएफटी, यवतमाळ काही तांत्रिक अडचणींमुळे 'ट्रस्ट' म्हणून नोंदणीकृत नव्हते आणि आता नोंदणीनंतर त्यांनी आयटीआर दाखल करण्याची आणि परतावा मागण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. डीएमएफटी नागपूर, यवतमाळ आणि रायगड यांनी आश्वासन दिले की विलंब माफी मिळाल्यानंतर आयकर विवरणपत्रे दाखल केली जातील.